# १५ वि ३-दिवसिय यूएमआय राष्ट्रीय परिषद कोची, केरळ येथे सुरु

### केंद्रीय मंत्री श्री पुरी यांच्या हस्ते UMI येथील महा मेट्रो स्टॉलचे उद्घाटन



नागपूर: अर्बन मोबिलिटी इंडिया (UMI) परिषदेच्या 15 व्या आवृत्तीचे आज कोची, केरळ येथे उद्घाटन झाले. या परिषदेचे उद्घाटन केंद्रीय गृहनिर्माण आणि नगर विकास मंत्री श्री हरदीप सिंग पुरी यांच्या हस्ते झाले, तर या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून केरळचे मुख्यमंत्री श्री पिनरई विजयन ऑनलाइन पद्धतीने उपस्थित होते.

या राष्ट्रीय परिषदेच्या अंतर्गत आज महा मेट्रो स्टॉलचे उद्घाटन करण्यात आले. केंद्रीय मंत्री श्री पुरी यांच्या हस्ते महा मेट्रोच्या नागपूर आणि पुणे प्रकल्पांच्या स्टॉलचे उद्घाटन करण्यात आले. महा मेट्रोने नागपूर आणि पुणे येथील प्रकल्पांतर्गत असलेल्या विविध विषयांचे चित्रण येथे केले आहे, ज्यात मालमत्ता विकास (पीडी), आर्थिक सुनिश्चीतता, प्रकल्पात राबवलेली वॉटर हार्वेस्टिंग आणि इतर तत्सम संकल्पनांचा समावेश आहे.

मेक इन इंडिया अल्युमिनिअम बॉडी कोच, मेट्रो प्रकल्पाची उपयुक्तता सर्व सामान्यांना समजावण्याकरता आयोजित होत असलेले मेट्रो संवाद, मेट्रोनियो प्रकल्प, महा मेट्रोने आजवर मिळवलेले विविध पुरस्कार असे काही निवडक विषय छायाचित्राच्या माध्यमाने प्रदर्शित केले आहेत. या स्टॉलला चांगला प्रतिसाद मिळत असून या येथील निमंत्रित आणि इतर या स्टॉलला आवर्जून भेट देत आहेत.

या तीन दिवसीय परिषदेचे उद्घाटन करताना केंद्रीय मंत्री श्री पुरी यांनी वाहतूक आणि मेट्रो रेल संबंधी विविध पैलूंवर भाष्य केले. 'मेक इन इंडिया' संकल्पनेला परिवहन क्षेत्राने खूप चांगला प्रतिसाद दिला असून त्याचा स्वीकार केला आहे, असे सांगत देशाच्या विकासासाठी ही एक चांगली गोष्ट आहे, असेही ते म्हणाले.